# नमुना-३ (सुधारित)

## खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने व थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यासाठी जमीन मालक किंवा हितसंबंधीत व्यक्तींकडुन हरकती / सुचना मागविण्याबाबत जाहीर नोटिस

**उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, पुसद यांचे कार्यालय, पुसद जि. यवतमाळ**

क्रमांक /उविअ/भु.सं./अका/कावि/ ३६ /२०१९ दिनांक : २३ /०१/ २०१९

ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद यांनी **यवतमाळ** जिल्ह्यातील मौजा ईसापुर ता. दिग्रस येथील खाजगी शेतजमीन दिग्रस पुसद रा.मा.क्र.२५७ व दिग्रस आर्णी रा.मा.क्र.२७३ जोडणारा दिग्रस वळण रस्ता बांधकाम करणे या सार्वजनिक प्रयोजनाकरीता खाजगी क्षेत्रातील जमीन सरळ खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे सादर केला आहे.

ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांचे नावे घेण्याबाबत त्यांचे कार्यालयीन प्रस्ताव जा.क्र./१११८/ दिनांक ३०/११/२०१७ व सुधारीत प्रस्ताव जावक क्रमांक/९४२/तां./दिनांक २२/०२/२०१८ व जा.पत्र क्र. ३९१०/आरे/दि. ०५/०७/२०१८ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी, आता

१) मी, श्री **नितीनकुमार हिंगोले,** उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, पुसद जिल्हा यवतमाळ याद्वारे, अनुसूची-एक मध्ये नमूद खासगी क्षेत्रातील जमीन खासगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद संबंधित खरेदी करावयाच्या जमिनीच्या जमिन मालकाचे नांव, गट नंबर व संपादन क्षेत्र इत्यादी तपशिल जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. सदर जमिनीबाबत जमीन मालकांचे हिस्यावर हक्क हितसंबंध, दत्तक, वारसाहक्क, गहाण, दान, बोजा, बाकी, भाडेपट्टा, कर्ज बक्षीसपत्र, जप्ती, करार-मदार अथवा इतर कोणताही हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१०** (दहा) दिवसाचे आत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेमध्ये सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी तथा सक्षम भूसंपादन प्राधिकारी, पुसद या कार्यालयामध्ये समक्ष दाखल करावी.

जर मुदतीमध्ये कोणीही हक्क, हितसंबंध किंवा आक्षेप व हरकत दाखल केले नाही तर कोणाचेही काही एक म्हणने किंवा हरकत नाही असे समजुन सदर मिळकतीवर कोणाचा बोजा आणि हितसंबंध नाही असे समजुन सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणा-या हरकती आमच्या कार्यालयावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास सदर जमिन मालकांची मिळकत निर्बंध व बिनाजोखमीची असल्याचे समजुन हे कार्यालय मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांचे वतीने खरेदीचा व्यवहार केव्हाही पूर्ण करेल व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

२. . . . .

२) प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी घेताना जिल्हाधिकारी समिती मार्फत भूमी संपादन, पुर्नवसन व पुर्वस्थापन करतांना वाजवी भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम २६ ते ३० व शेडयुल १ तसेच महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि. १२.०५.२०१५ व दि. ३०.०९.२०१५ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी मोबदला निश्चित करण्यात येईल.

३) संबंधित भुधारकाकडुन शासनाच्या प्रस्तावित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांचे नांवे थेट खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असणेबाबतचे संमतीपत्र सर्व संबंधीत कास्तकारांनी दिले आहे.

## अनुसूची (एक)

भूसंपादन प्रकरण क्र. ०५/४७/२०१५-१६ मौजे ईसापुर ता. दिग्रस जि. यवतमाळ

**प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ट (खरेदी घ्यावयाच्या) जमिनीचा तपशिल**

| अ. क्र. | जमिन मालकाचे नांव | गांव | स.नं. / गट क्र. | | ७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अभिलेखानुसार | वहीवाटीनुसार | | | |
| 1 | अनुराग चंद्रशेखर पाटील | ईसापुर | 62 | 62 | 7.99 | 0.55 | -- |
| 2 | अ. सलीम अ. कादर व इतर<br>म. एजाज अ. हक शेख | ईसापुर | 61 | 61 | 4.39 | 0.56 | एकत्र वहिवाट |
| 3 | शोभा सुधाकर आसेगांवकर | ईसापुर | 60 | 60 | 1.21 | 0.06 | -- |
| 4 | मल्लीकार्जुन संस्थान, दिग्रस | ईसापुर | 67 | 67 | 13.76 | 0.45 | -- |
| 5 | सतिष रिखबचंद मेहता | ईसापुर | 71 पै | 71 पै | 6.85 | 0.61 | -- |
| 6 | श्रीकांत हिरामण नेमाडे व ईतर | ईसापुर | 70 पै | 70 पै | 3.56 | 0.14 | एकुण क्षेत्र 0.21 यापैकी 0.07 हे.आर नालाबाधित क्षेत्र |
| 7 | विणाबाई वि.पंजाब जामकर व ईतर | ईसापुर | 70 पै | 69 पै | -- | 0.17 | गटबदल |
| 8 | विणाबाई वि.पंजाब जामकर व ईतर | ईसापुर | 69 पै | 69 पै | 1.00 | 0.02 | -- |
| 9 | बबन नारायण जामकर<br>नर्मदाबाई नारायण जामकर व ईतर | ईसापुर | 69 पै | 69 पै | 1.58 | 0.09 | एकुण क्षेत्र 0.10 यापैकी 0.01 हे.आर रस्ताबाधित क्षेत्र |
| 10 | म. शादाब म. हारुन | ईसापुर | 83 पै | 83 पै | 4.12 | 0.18 | एकुण क्षेत्र 0.27 यापैकी 0.09 हे.आर रस्ताबाधित क्षेत्र |
| 11 | म. दानिश म. हारुन | ईसापुर | 83 पै | 83 पै | 4.13 | 0.13 | एकुण क्षेत्र 0.18 यापैकी 0.05 हे.आर रस्ताबाधित क्षेत्र |
| 12 | कल्पनाताई ज्योतीराम चव्हाण | ईसापुर | 82 | 82 | 1.62 | 0.43 | -- |
| 13 | कल्पनाताई ज्योतीराम चव्हाण | ईसापुर | 81 | 82 | -- | 0.03 | गटबदल |
| | | | | | **एकुण** | **3.42** | |

दिनांक : २३ /०१/ २०१९

(नितीनकुमार हिंगोले)
उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी, पुसद